महाराष्ट्र शासन -कृषी विभाग

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

३० ब, आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई-४०० ००५

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/२ ई-मेल :-mahapocra@gmail.com

जा क्र. नादेकृसंप्र- ०११८/ प्र क्र ११०/ कृव्यवि / ४२८ दि. २३.१०.२०१८ २४

प्रति,

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
(प्रकल्पातील सर्व जिल्हे)

**विषय :- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत एकात्मिक शेती पद्धती घटकांतर्गत बंदिस्त शेळीपालन व परसातील कुक्कुट पालन मार्गदर्शक सूचना सन २०१८-१९**

**संदर्भ :-** जा. क्र. नादेकृसंप्र-०११८/प्र क्र ११०/ कृव्यवि/३११ दि.- ०४/०९/२०१८

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत एकात्मिक शेती पद्धती घटकांतर्गत बंदिस्त शेळीपालन व परसातील कुक्कुट पालन बाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये लाभार्थी निकषामध्ये ग्राम कृषि संजीवनी समितीने मान्यता दिलेले भूमिहीन व्यक्ती असा उल्लेख आहे. याबाबत क्षेत्रीय स्तरावरून स्पष्टता करणेबाबत विचारणा होत असलेने 'भूमिहीन व्यक्ती' ऐवजी 'भूमिहीन कुटुंबातील व्यक्ती' वाचावे असे स्पष्ट करण्यात येत आहे. त्यासाठी तलाठी यांचेकडील उपलब्ध अभिलेख व इच्छुक लाभार्थ्याने दिलेले सोबतच्या नमुन्यातील स्वयंघोषणा पत्र याआधारे ग्राम कृषि संजीवनी समितीने लाभार्थी निवडीबाबत निर्णय घ्यावयाचा आहे.

विधवा आणि परितक्त्या महिलांना प्राधान्याने लाभ देण्याबाबत सदर मार्गदर्शक सुचानामध्ये उल्लेख असून घटस्फोटीत महिलांनाही सदर घटकांचा प्राधान्याने लाभ द्यावयाचा आहे. विधवा, परितक्त्या व घटस्फोटीत महिलांना लाभ देणेसाठी ग्रामसेवक यांचे अभिप्राय व इच्छुक लाभार्थ्यांचे त्यांचेकडून सोबतच्या नमुन्यातील स्वयंघोषणा पत्र घेऊन त्याआधारे ग्राम कृषि संजीवनी समितीने लाभार्थी निवडीचा निर्णय घ्यावयाचा आहे.

सोबत :- वरीलप्रमाणे

प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई

**प्रत- माहितीस्तव सादर**

१. सचिव, कृषि व पणन विभाग, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव, पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई

**माहिती व पुढील कार्यावाहीस्तव अग्रेषित**

३. आयुक्त, कृषि , कृषि आयुक्तालय, पुणे
४. आयुक्त, पशुसंवर्धन, पुणे
५. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व)
६. उप विभागीय कृषि अधिकारी, (प्रकल्पांतर्गत सर्व)

**प्रपत्र -१**
**भूमिहीन प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती ------------------------------------------- वय --------- रा. ---------------- ता. ------------ जि. ------------ आधार क्र. -------------------------- यांचेकडे अथवा त्यांच्या कुटूंबातील व्यक्तींकडे शेती/शेतजमीन नाही. यास्तव श्री./श्रीमती ------------------------------------ हे भूमिहीन असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

दिनांक:     /     /

**कामगार तलाठी**

**नाव-------------**

**सजा ------------**

**प्रपत्र -२**

**विधवा /परितक्त्या/ घटस्फोटीत असल्याबाबत दाखला**

प्रमाणित करण्यात येते की, श्रीमती ------------------------------------------ वय --------- रा. --------------- ता. ------------ जि. ------------ आधार क्र. -------------------------- हे विधवा /परितक्त्या/ घटस्फोटीत असल्याचे उपलब्ध अभिलेखावरून/ माझ्या निरीक्षणाच्या आधारे निदर्शनास येते. त्याआधारे सदर व्यक्ती विधवा /परितक्त्या/ घटस्फोटीत असल्याचे दाखला देण्यात येत आहे.

दिनांक: / /

**ग्रामसेवक**

**नाव-------------**

**ग्रामपंचायत ------------**